महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु ४०१०९ एमएच २००५ एसजीसी १५३६४५
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
संकेतस्थळ: www.mahadiscom.in, ई-मेल cecommho@gmail.com

---

क्र.मु.अ.(वा)/वि.म. सवलत/ 023347 दिनांक: 07 SEP 2022

# वाणिज्य परिपत्रक क्र. ३३८

*(वाणिज्य परिपत्रक क्र.३३७ मध्ये सुधारणा)*

**विषय:** विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील उद्योगांना वीजदर सवलतीबाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत निर्गमित केलेल्या वाणिज्य परिपत्रक क्र.३३७ दि.०६/०७/२०२२ मध्ये सुधारणा करण्याबाबत.

**संदर्भ:** १) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.११०/ऊर्जा-५ दि.२३/०६/२०२२
२) वाणिज्य परिपत्रक क्र.३३७ दि.०६/०७/२०२२
३) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखालील दि.१७/०८/२०२२ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

विदर्भ मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सवलतीचे सुसूत्रीकरण करण्याच्या अनुषंगाने शासनाने संदर्भ क्र.१ अन्वये सुधारीत वीजदर जाहीर केलेले आहेत. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ च्या वाणिज्य परिपत्रकाद्वारे शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर परिपत्रकामध्ये खालील अट घालुन देण्यात आलेली आहे.

- *थकबाकीदार अथवा थकबकीचा भरणा करण्याकरीता हप्त्याची सुविधा (Installment) घेतलेल्या ग्राहकांना सदर सवलत लागू नाही. तसेच थकबाकीच्या कारणास्तव न्यायालयीन प्रक्रियाधीन असलेल्या ग्राहकांना सुध्दा सदर सवलत लागू राहणार नाही.*

वर नमूद अटीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ विभागाअंतर्गत असलेल्या बहुतांश औद्योगिक ग्राहकांची Activity Code माहिती व तंत्रज्ञान प्रणालीमध्ये नमूद नसल्याने अशा ग्राहकांना सवलतीचा लाभ देण्यात आलेला नाही. त्यामुळे संबंधित कार्यकारी अभियंता, सं. व सु. विभाग व संबंधित अधिकारी यांनी ग्राहकांशी प्रत्यक्ष संपर्क साधून Activity Code माहिती व तंत्रज्ञान प्रणालीमध्ये अद्ययावत करावा.

२. थकाबाकीचा भरणा करण्याकरीता थकबाकीदार ग्राहकांना महावितरण कंपनीच्या प्रचलित धोरणानुसार हप्त्याची सुविधा (Installment) देण्यात येते, अशा ग्राहकांना देखिल सवलतीचा लाभ देण्यात यावा. तथापि, अशा ग्राहकांनी सवलतीचा लाभ प्राप्त करण्याकरीता त्यांच्या चालू वीज देयकाचा हप्त्यासह भरणा तत्पर देयक भरणा दिनांकापर्यंत करणे आवश्यक आहे.

३. ज्या ग्राहकाचे प्रकरण वादग्रस्त थकबाकीकरीता न्यायप्रविष्ट आहे व थकबाकी वसूलीकरीता स्थगिती आदेश ग्राहकाच्या बाजूने मंजूर असल्यास अशा ग्राहकांनी वादग्रस्त नसलेली रक्कम चालू देयकासोबत

तत्पर देयक भरणा दिनांकापर्यंत करण्याच्या अटीवर प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे सवलतीचा लाभ देण्यात यावा.

४. ज्या प्रकरणात वादग्रस्त थकबाकी न्यायप्रविष्ट आहे परंतु ग्राहकास स्थगिती आदेश मंजूर करण्यात आलेला नाही. अशा प्रकरणात ग्राहकास सवलतीचा लाभ देण्यात येऊ नये.

५. याबाबतची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दि.०१/०४/२०२२ पासून करण्यात येईल.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सुचित करण्यात येते की, वरील सुधारीत निर्देशांची नोंद घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

**संचालक (वाणिज्य)**
**महावितरण**

**प्रत:**
प्रेषण यादीप्रमाणे.